
पुरा बेलप्रे - प्रेरक लायब्रेरियन

कथाकारांची मेणबत्ती




लूसिया गोंजालेज
मराठी : अश्विनी बर्वे



१९२९ मधला हिवाळा विशेषकरून माझे चुलत भाऊ-बहीण हिल्डमार आणि सैटियागो यांच्यासाठी कठीण होता. काही महिन्यांपूर्वीच ते गरम शहर प्यूर्टो रिकोहून न्यूयॉर्क शहरात आले होते. ज्या ठिकाणाहून ते आले होते ते न्यूयॉर्कपेक्षा खूप दूर होते. खासकरून जेव्हा थ्री किंग्स डे (तीन राजांचा) चा सण जवळ येत होता.

पण तरीही एक जादुई गोष्ट झाली. त्यांच्या वर्गात एक नवीन महिला आली. **पुरा बेलप्रे जी** एक प्रतिभाशाली कथाकार आणि लायब्रेरियन होती. त्यांनी सार्वजनिक पुस्तकांच्या संदर्भात मुलांचे डोळे उघडले. वाचनालय शेवटी सगळ्यांसाठी असते. मग ती व्यक्ती स्पानिश बोलत असो, वा इंग्रजी किंवा दोन्ही भाषा बोलत असू दे.

या प्रेरक पुस्तकात लूसिया गोंजालेजने, न्यूयॉर्क शहराची पहिली लॅटिन लायब्रेरियन पुरा बेलप्रेला श्रद्धांजलि दिली आहे.



पुरा बेलप्रे

प्रेरक लायब्रेरियन

कथाकारांची मेणबत्ती



परिचय

महामंदी (१९२९-१९३५) च्या सुरुवातीच्या काळात, प्यूर्टो रिकोच्या अनेक लोकांनी मोठ्या शहरात, न्यूयॉर्क मध्ये काम करण्यासाठी आणि अधिक चांगल्या संधी शोधण्याच्या निमित्ताने आपलं छोटे द्वीप सोडलं होतं. प्यूर्टो रिकोचे अधिकांश लोक मॅनहॅटनच्या उत्तरेला राहत असत, जे अल-बैरियोच्या नावाने ओळखले जाते. स्पॅनिश मध्ये त्याचा अर्थ “शेजारी”.

अल-बैरियोचे लोकांसाठी न्यूयॉर्कचा हिवाळा सहन करणे कठीण होते.हिवाळ्यात त्यांना आपल्या उबदार द्विपाची आठवण येत असे. पण त्याच वेळी काहीतरी अद्भुत झाले. पुरा बेलप्रे नावाची एक प्रतिभाशाली कथाकर्तीला न्यूयॉर्क पब्लिक लायब्रेरी सिस्टम मध्ये प्रथम प्यूर्टो रिकन लायब्रेरियनच्या रुपात काम करण्यास ठेवले. आपलं काम, कथा आणि पुस्तकांच्या द्वारे पुरा बेलप्रे ने अल-बैरियोच्या मुलांना प्यूर्टो रिकोचे सौहार्द आणि सुंदरता यांची ओळख करून दिली..

- लूसिया गोंजालेज



आपला चुलतभाऊ सैंटियागोच्या बरोबर शाळेतून घरी जाते वेळी हिल्डमार थंडीने कापत असे. दुपारच्या बर्फाच्या हवेने तिचे हात गोठले होते आणि त्यांचे चेहरे भाजल्या सारखे झाले होते. हिवाळ्याच्या सुट्टीच्या आधीचा तो शाळेचा शेवटचा आठवडा होता. ते न्यूयॉर्क मधले हिल्डमारचे पहिले "नवदाद" पर्व पण होते.

न्यूयॉर्कच्या हिवाळ्याने हिल्डमारला आश्चर्यचकित केले. त्याने इतकी अधिक थंडी याआधी कधीच सहन केली नव्हती. काही महिने पहिले हिल्डमार आपल्या परिवारा बरोबर प्यूर्टो रिकोहून न्यूयॉर्क पर्यंत, एल-पोंस नावाच्या मोठ्या जहाजाने आली होती. त्या प्रवासाला पाच दिवस लागले होते. आता उन्हाळयातला सूर्य अल-बैरियोहून खूप दूर वाटत होता.

आणि म्हणून हिल्डमार आणि सैंटियागो जेवढे लवकर शक्य होईल तेवढे लवकर घरी पोहचले, जिथं ते जुन्या लोखंडी चुली वर आपले हात शेकत असत.





त्या संध्याकाळी पूर्ण परिवार एकावेळी जेवायला बसला.


"बेंडिटो! मामा नेनिताने श्वास घेत म्हटले. “मला आपल्या छोट्या द्विपाव्रच्या डिसेंबरच्या रात्रीच्या नरम आणि गरम हवेची आठवण येते आहे.”

"ठीक आहे," सैंटियागोचे वडील टियो पेड्रो म्हणाले. “मला स्वादिष्ट पेस्टल आणि भाजलेल्या डुक्कराच्या मासाचा गंधाची आठवण येत आहे.

“मला परांदा आणि एगुइनलडोस सणांची आठवण येत आहे. जेव्हा आपल्या घरातले शेजाऱ्यांना भेटायला जात असत, आणि मग गाणी गात,नाचत आणि खातपित असत.” सैंटियागोची आई टिटी मारियाने डोळे बंद करत म्हटलं.

“आणि थ्री किंग्स डे (तीन राजांचा दिन), वर्षातला सगळ्यात चांगला दिवस होता.” सैंटियागो ओरडला.

“राजे इतक्या लांब प्रवास करतील काय?” हिल्डमारने विचारलं, “या वर्षी ते येतील का?”




दुसऱ्या दिवशी शाळेच्या रस्त्यावरून रोजच्या सारखे, हिल्डमार, सैंटियागो आणि टिटी मारिया यांनी खिडक्या असणारी मोठी इमारत पार केली, जी त्यांना आत येण्याचे आमंत्रण देत असे. ती इमारत गल्लीच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत पसरलेली होती. ती इतर अंधाऱ्या इमारती पेक्षा वेगळी होती.

"टिटी मारिया, त्याच्या आत काय आहे?” हिल्डमारने विचारलं. “आपण आत जाऊ शकतो का?”

“ते एक वाचनालय आहे," टिटी मारियाने उत्तर दिलं, "पण ते वाचनालय दंगा करणाऱ्या तुमच्या सारख्या मुलांसाठी नाही.”

"पण तिथे तुमच्या सारखी मोठी माणसं जाऊ शकतात का?” सैंटियागोने विचारले.

“हे बघ, आपण लोक इंग्रजी नाही बोलत,आणि तिथले लोक स्पॅनिश बोलत नाहीत,” टिटी मारियाने मुलांना सांगितलं. आणि म्हणून ती कधी त्या वाचनालयात गेली नाहीत.





पण त्याच दिवशी दुपारी, हिल्डमार आणि सैंटियागोच्या वर्गात एक विशिष्ट पाहुणे आले. ती एक उंच आणि हडकुळी स्त्री होती, जिचे काळ्या रंगाचे चमकणारे डोळे होते. जेव्हा ती बोले, तेव्हा तिचे हात पक्ष्यांच्या पंखासारखे हवेत उडत असत.


"गुड मॉर्निंग," ती म्हणाली. “माझं नाव पुरा बेलप्रे आहे. मी सार्वजनिक वाचनालयातून आले आहे. आज मी तुमच्यासाठी गोष्टी आणि कठपुतळ्या घेऊन आले आहे.”

मग मिस बेलप्रेने कठपुतळ्या बरोबर इंग्रजी आणि स्पॅनिश मधल्या कहाण्या सांगितल्या. मूर्ख जुआन बोबो द्वारे तीन पायांचे भांड्याचा पाठलाग करणारी गोष्ट ऐकवल्यावर सगळी मुलं जोरजोरात हसू लागले. आपला शो च्या शेवटी, मिस बेलप्रेने मुलांना हिवाळ्याच्या सुट्टीत वाचनालयात येण्याचे आमंत्रण दिले.

"लायब्ररी सगळ्यांसाठी असते,” ती म्हणाली.

अल-बैरियो मध्ये, हिल्डमारने प्रत्येकाला ही खुशखबरी ऐकवली.





जेव्हा टिटी मारिया त्या दिवशी मुलांना शाळेतून घरी न्यायला गेली, तेव्हा मुलांनी तिला विशेष पाहुणे, कठपुतळ्या आणि वाचनालय यांच्याबाबत सांगितले.

"टिटी! टिटी! त्या वाचनालयात लोक स्पॅनिशपण बोलतात." हिल्डमार ओरडत म्हणाली.

“आज आपण वाचनालयात जाऊ शकू का?” सैंटियागो विनंती करत म्हणाला.

"स्पॅनिश? वाचनालयात? पण मुलांनो मी आज खूप कामात आहे," टिटी त्यांना समजावत म्हणाली. “मी वचन देते की एक दिवस मी तुम्हांला तिथं जरूर घेऊन जाईन.”

"मला वाटते की आईने पण तिथं यावे." हिल्डमार म्हणाली, “पण ती नेहमी कामातच असते.”

“कदाचित या शनिवारी आपण तिथं जाऊ शकतो,” टिटी मारियाने सुचवलं.

“खूप छान!" हिल्डमार आणि सैंटियागोने टाळ्या वाजवल्या आणि मग ते रस्त्यावर धावत पुढे गेले, जिथं डॉन रेमन आणि डोना सोफिया ताजी भाजी, ब्रेड विकत असत आणि एक कॅफे चालवत असत.



"आज ही मुलं एवढी खुश का आहेत? आपल्या दुकानाच्या काउंटरच्या मागून डोना सोफियाने विचारलं.

"ज़रा आम्हांला पण चांगली बातमी ऐकू दया," डॉन रेमनने विचारलं.

"डॉन रेमन, त्या वाचनालयातले लोक स्पॅनिशपण बोलतात!" हिल्डमारने घोषणा केली. दुकानातल्या इतर ग्राहकांनी सुद्धा हिल्डमारचे बोलणे रस घेऊन ऐकले.

"काय सांगतात?" ते ओरडले.

"तिथं स्पॅनिश पुस्तके सुद्धा आहेत का?" डोना सोफियाला माहित करून घ्यायचं होतं.

"आम्हीपण तिथं जाऊन बघू या," डॉन रेमन म्हणाला.


त्या शनिवारी, हिल्डमारची आई आणि टिटी मारियाने, डोना सोफिया आणि डॉन रेमनला त्यांच्या बरोबर वाचनालयात येण्यासाठी आमंत्रित केले. सॅंटियागोने आपला चांगला मीटर मॅनुअलला पण बोलावले.

सगळा समुह बर्फाने झाडलेल्या फुटपाथवरून चालू लागला आणि त्यांनी प्यूर्टो रिकोच्या मस्त गरम हवेची आठवण काढली. लवकरच ते वाचनालयाच्या सुंदर इमारतीत पोहचले.

मोठे लोक वाचनालयाचा उंच दरवाज्याचे निरीक्षण करत राहिले आणि हे विचार करत राहिले की आत जावे की नाही. पण हिल्डमर, सेंटिआगो आणि मॅनुएल मोठ्यांना मागे सोडत घाईने पायऱ्या चढून गेले. ते जास्त वाट बघू शकत नव्हते.







आत गोष्टीची खोली (स्टोरी-रूम) मुलांनी भरून गेली. मिस बेलप्रे यांनी हसत मुलांचे उत्साहाने स्वागत केले.

"स्वागत आहे!" त्या म्हणाल्या.

मग मिस ने बेलप्रे एका कथाकाराची मेणबत्ती लावली आणि लवकरच कहाणी सांगायला सुरुवात केली. "एके काळाची गोष्ट आहे, प्यूर्टो रिको मध्ये ..." मिस बेलप्रेने यांनी ती गोष्ट सांगितली जी हिल्डमार आणि सैंटियागोने पहिल्यांदा आपली आजीकडून ऐकली होती. ती कहाणी मार्टिना नावाच्या एका सुंदर स्पॅनिश झुरळाबद्दल आणि एका शूर उंदराच्या बद्दल होती.टाळ्यांच्या गडगडाटात गोष्टीचा शेवट झाला.

“आता सगळ्यांनी आपले डोळे बंद करा आणि मनात एक इच्छा धरा.” मिस बेलप्रे यांनी म्हटले... “ठीक आहे,जेव्हा मी कथेची मेणबत्ती विझवेल तेव्हा तुमची इच्छा नक्की पूर्ण होईल.

मुलांनी आपले डोळे गच्च बंद केले आणि प्रत्येकाने कोणती ना कोणती इच्छा मनात धरली.

जेव्हा मुलांनी डोळे उघडले तेव्हा मिस बेलप्रे यांनी एक विशेष घोषणा केली. “बघा थ्री किंग्स डे चा सण येत आहे. यावर्षी आपण वाचनालयात एक नाटक, नृत्य आणि एक परेड करून एक मोठा उत्सव साजरा करू या. ते नाटक प्यूर्टो रिकोच्या स्पॅनिश झुरळ आणि शूर उंदराच्या कहाणीवर आधारित असे. त्या नाटकात तुम्ही कोण कोण भाग घेणार?

सॅंटियागोने हात वर केला. “मी जरूर भाग घेईन.” तो म्हणाला.

“मलाही मदत करायची आहे.” इतरांनी पण आवाज द्यायला सुरुवात केली.

सैंटियागोला शूर उंदराच्या पात्रासाठी निवडले गेले. हिल्डमारने पण आपला हात उचलला होता. तिचं हृदय जोरजोरात धडकू लागलं होतं जेव्हा मिस बेलप्रेने तिला सगळ्यात महत्वपूर्ण – झुरळाच्या – मार्टिनाच्या भूमिकेसाठी निवडले.

“आपल्याला अभिनय करणारे पात्र तर मिळाले,” बेलप्रे म्हणाल्या, “पण आपल्याला वेशभूषा, संगीत आणि रंगमंच सजवण्यासाठी सुद्धा मदत हवी आहे.”



लवकरच ती बातमी चारी बाजूला पसरली. “ते वाचनालयात स्पॅनिश बोलतात. आणि तिथं थ्री किंग्स डे साजरा करण्यासाठी उत्सव होणार आहे.”

डोना सोफियाने डॉन रेमनला सांगितले, त्याने पाद्रे साइमनला सांगितले. मग पाद्रीने चर्च मध्ये या गोष्टीची घोषणा केली. त्या रविवारच्या सकाळच्या प्रार्थने नंतर, प्यूर्टो रिकोतले खूप लोक एकत्र आले. बैठकीत पुरा बेलप्रे पण सामील झाली.


“प्रथमच,“ त्या म्हणाल्या, "न्यूयॉर्क मध्ये थ्री किंग्स डेचा सण साजरा केला जाईल.”

प्रत्येकाला मदत करायची इच्छा आहे.

“मी वेशभूषा करण्यासाठी मदत करेन,” टिटि मारिया म्हणाली.

मी रंगमंचासाठी पडदे करेन,” शिलाई कारखान्यात काम करणारी मामा नेनीता म्हणाली.

“आणि मी मंच तयार करेन,” डॉन रेमन म्हणाले. “प्यूर्टो रिको मध्ये एक सुतार होता.”






त्या दिवसांनतर आसपासचे शेजारी त्या मोठ्या कार्यक्रमाच्या आयोजनात मदत करण्यासाठी रोज वाचनालयात येऊ लागले. कपाटात आपल्या साठी स्पॅनिशमध्ये लिहलेली पुस्तके आणि वर्तमानपत्र बघून खूप खुश झाले.

मुलांनी नाटक, नृत्य आणि कहाणीचा पूर्व अभ्यास केला. डॉन रेमनने सजावट करण्यासाठी आपल्या दुकानातली खोकी आणि टोपल्या दान म्हणून दिल्या. अल-बैरियोच्या आय चर्च किंवा वाचनालयात एकमेकींना रंगकाम, शिवणकाम आणि चिकटकाम करण्यासाठी नियमित भेटत असत.

शेवटी, ५ जानेवारीच्या संध्याकाळपर्यंत वाचनालय थ्री किंग्स डेचा सण साजरा करण्यासाठी तयार झाले.





दुसऱ्या दिवशी दूर –दूर वरून लोक आले. वाचनालयाच्या बाहेर बर्फाचा जाड थर जमा झाला होता. पण वाचनालयाच्या आत एका शेकोटी जळत होती आणि कथाकाराची मेणबत्ती जळत होती. खोली मुलं आणि मोठ्या लोकांच्या आवाजाने गुंजत होती.सगळे एकसाथ स्पॅनिश आणि इंग्रजीत बोलत होते.

“इथं किती सुंदर आहे!”

त्या दिवशी वाचनालयातल्या रिडिंग रूम मध्ये कैरिबियनचे एक बेट झाले होते. मुलांचा एका समुहाने स्थानिक प्यूर्टो रिकनची गाणी गायली. इतर लोक अधिरतेने कार्यक्रम सुरु होण्याची वाट बघत होते.

"अस्लोटो!" सूत्रधाराचा आवाज ऐकून सगळे उत्साहित झाले.जवळून बघण्यासाठी मुलं आपल्या पंज्यावर बसले.

"सलूडोस, सैलूडोस, वेंगो ए सलूदार..." सूत्रधाराने गायलं.


डोना सोफियाने ढोल वाजवला; चिकी-चिकी-चिक, चिकी-चिक. डॉन रेमनने वाद्य वाजवलं. लेब्रोनने समूहाचे नेतृत्व केले.

अचानक, तीनों राजा (थी किंग्स) प्रकट झाले. त्यांनी मुलांना चॉकलेट आणि मिठाई वाटली आणि ते पूर्ण खोलीभर फिरले.

मग संगीत बंद झाले आणि नाटक सुरु झाले. “कितीतरी वर्षे आधी, एका छोट्या गोल घरात,एक छोटी बाल्कनी होती, मार्टिना नावाचे एक स्पॅनिश झुरळ राहत असे.”

हिल्डमारने मंचावर पाय ठेवला. ती सगळ्यात सुंदर दिसत होती.

“बघा सैंटियागोला ..तो किती सुंदर उंदीर दिसत आहे.”



मिस बेलप्रेने आपल्या नेहमीच्या पद्धतीने कार्यक्रमाचा शेवट केला. “तुमचे डोळे बंद करून मनात एक इच्छा धरा,” तिने हातात कथाकाराची मेणबत्ती घेऊन म्हटले..




हिल्डमारने आपले डोळे बंद केले आणि इच्छा धरली. जेव्हा तिने आपले डोळे उघडले, तेव्हा तिचे डोळे मिस बेलप्रेच्या डोळ्यांना भिडले, “आज, सगळ्यांच्या मदतीने आपण प्यूर्टो रिकोचा उत्साह आणि सुंदरता न्युयॉर्क मध्ये घेऊन आलो. हे वाचनालय आपल्या सर्व लोकांसाठी आहे. जेव्हा मी कथाकाराची मेणबत्ती विझवेल तेव्हा तुमची इच्छा नक्की पूर्ण होईल.”

पुरा बेलप्रेच्या बद्दल

पुरा बेलप्रे चा जन्म १८९९ आणि १९०३ च्या मघल्या कथाकारांनी भरलेल्या एका छोट्या शहरात सिड्रा, प्यूर्टो रिको मध्ये झाला होता. त्यांनी आपल्या आजीकडून अनेक गोष्टी ऐकल्या होत्या, त्या गोष्टी पिढी-दर-पिढी लोकांनी तोंडी ऐकवल्या होत्या. १९२० च्या दशकाच्या सुरुवातीला या गोष्टी त्यांच्या बरोबर अमेरिकेत आल्या.

पुरा बेलप्रेने आपल्या करियरची सुरुवात मुलांच्या वाचनालयात काम करून केली. त्या न्यूयॉर्क पब्लिक लायब्ररीत काम करण्यासाठी ठेवलेली पहिली प्यूर्टो रिकन लायब्रेरियन होती. त्यांना वाचनालयात काम करण्याची आवड होती, त्यांची ही इच्छा आयुष्यभर राहिली. पुरा बेलप्रे आपल्या गंभीर आणि प्रेरक आवाजात एक चांगली कथाकथनकार आणि सुंदर कठपुतली कलाकार होती. त्यांची कहाणी पेरज आणि मार्टिना" (झुरळ आणि उंदीर), प्रथम १९३२ मध्ये प्रकाशित झाली, आणि लवकरच अभिजात बाल-साहित्य म्हणून ओळखले जाऊ लागली. १९९६ मध्ये लॅटिन लेखक आणि चित्रकारांना सन्मानित करण्यासाठी "पुरा बेलप्रे पुरस्कार" ची स्थापना केली गेली. या लेखकांची आणि कलाकारांची बाल पुस्तके सांस्कृतिक अनुभवचा एक उत्सव आहे.

एक लेखक, कथाकार आणि लायब्रेरियनच्या रुपात आपले दिर्घ करियरच्या काळात, पुरा बेलप्रेने त्या समुदायातल्या युवकांच्या अनेक पिढ्यांना प्रेरित केले. पुरा बेलप्रेला , “जॉनी एप्लासीड” सारखं व्हावं वाटत असे. प्यूर्टो रिको मध्ये एका पुस्तकात त्यांनी जॉनी एप्लासीडच्या बद्दल वाचलं होतं.
म्हणून एका कथाकाराच्या रुपात,त्यांनी आपल्या
गोष्टीचे बीज पूर्ण देशात रुजवले.



समाप्त